# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## आर्थिक वर्ष २००८-०९ चे आर्थिक विवरण पत्रे तयार करण्यासाठी अवलंबिलेली लेखाधोरणे

**अ) लेखे तयार करण्यासाठीचे मूलभूत घटक:-**

लेखे सुधारीत अशा उपार्जित (Acrual) पध्दतीने तयार केले आहेत. म्हणजेच या पध्दतीमध्ये प्रमुख उत्पन्न निश्चित झाल्याबरोबर आणि उपार्जित खर्च हा, देयक संमंत झाल्याबरोबर अधिदान म्हणून धरण्यात येतो, यासंबंधी प्रत्यक्ष रोख व्यवहार कधी झाला हे महत्वाचे मानले जात नाही.

**ब) महसूल निश्चिती Revenue Recognition :-**

खालील नमूद केलेले महसूल सोडून, महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्न हे उपार्जित झाल्या बरोबर उत्पन्न म्हणून धरण्यात आले आहेत.

**क) विशिष्ठ बाबींच्या महसूलांची नोंद घेणे:-**

**१.जकात - Octroi**

गोळा झालेल्या जकात कर आणि परतावे यांचा हिशोब हा प्राप्तीच्या आधारावर करण्यांत आला आहे. सदरहू महसूलाचे स्वरुप लक्षात घेता, तसेच उपार्जित पध्दत आणि प्रत्यक्ष प्राप्ती यांच्यामध्ये विशेष फरक नसल्यामुळे, उपार्जित पध्दतीत थोडा बदल स्वीकारार्हय असल्यामुळे, स्वीकृत केला आहे. ज्या प्रकरणामध्ये चालू खात्यामध्ये जमा झालेले पैसे व परतावे यातील वेळेमध्ये फरक आहे व सर्वसाधारणपणे उपार्जित व जमा सारखेच आहे, त्यांचा अपवाद केला आहे.

**२. मालमत्ता कर - Property Tax**

मालमत्ता करामध्ये देय असलेली सूट (Rebate) ही प्रत्यक्ष ज्या वर्षी दिली त्याच वर्षामध्ये धरण्यात आलेली आहे.

**३. महसूली अर्थसहाय्य, अनुदाने आणि विशेष निधी ( Revenue Grants, subsidies & Special Funds ) :-**

अर्थसहाय्य म्हणून मिळालेला महसूल हा रोखतेवर आधारीत, (Cash Basis) हिशोबात धरण्यात आलेला आहे. २००७-०८ वर्षापासून खासदार व आमदार निधी म्हणनू मिळणारे पैसे हे, ज्या कामासाठी पैसे प्राप्त झाले आहेत ते काम पुर्ण होईपर्यंत दायित्व Liability म्हणून दाखविण्यांत आले आहेत. (नॅशनल म्युनिसिपल अकौंट्स मॅन्युअलच्या परीच्छेद १७.११) मध्ये दर्शविल्याप्रमाणे वरील नमूद अनुदानाच्या वापरामधून तयार होणारी मालमत्ता काम पुर्ण होईपर्यंत ती प्रगतीपथावरील कामें म्हणून धरली आहेत.

**ड) आगाऊ करण्यांत आलेला खर्च Prepaid Expenses :-**

वर्षभरामध्ये भरलेला विम्याचा हप्ता व अशाप्रकारचे इतर खर्च ( ज्यामध्ये खर्चाचा काही हिस्सा हा पुढील आर्थिक वर्षामधील काही भागासाठी असू शकतो.) हे जेथे अशा प्रकारची आवश्यक माहिती उपलब्ध आहे, तेथे विभागून दाखविण्यांत आले आहेत. परंतू काही ठिकाणी, तफावतीमुळे फारसा फरक पडत नसल्यामुळे ती, उपार्जित पध्दतीमध्ये होत असलेल्या क्रमशः प्रगतीनुसार स्विकृत करण्यात आली आहे.

**इ) आस्थापना खर्च - Establishment Expenses :-**

आस्थापना खर्चामध्ये कर्मचा-यांसाठी होणारा खर्च जसे, पगार, बोनस, कामगार कल्याण आणि इतर खर्च समाविष्ट करण्यात आलेले आहेत परंतू यामध्ये, सदरहू वर्षामध्ये देय असलेली निवृत्ती वेतन व उपदान यासाठी असलेली तरतूद लक्षात घेतलेली नाही. यांचा खर्च ज्या वर्षी दिली त्याच वर्षामध्ये धरण्यात आलेली आहे.

**फ) विशिष्ट कामासाठीचा निधी - Earmarked Funds :-**

विशिष्ट कामासाठीचा प्राप्त झालेला निधी आणि विशिष्ट बाबींसाठीची गुंतवणूक यांची माहिती उपलब्ध नसल यामुळे, हा निधी विशिष्ट कामासाठी दर्शविता आलेला नाही.

**ग) सुरक्षित कर्ज :- Secured Loans :-**

प्राप्त झालेली सुरक्षित कर्जे ही महानगरपालिकेच्या चार विभागात, नमूद केलेल्या, येणे असलेल्या रकमांशी सुरक्षित केलेली आहेत.

**ह) प्राप्त अनामत रकमा, धनकोची देणी आणि इतर चालू दायित्व (Deposits Received, Creditors Balances and other current liabilities) :-**

तृतीय पक्षी खात्री करुन घेण्याची व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे प्राप्त अनामत रकमा, धनकोंची देणे आणि इतर चालू दायित्व ही अनिश्चित आहेत.

**१ )अ) स्थावर मालमत्ता - Fixed Assets :-**

१) खरेदी करुन किंवा बांधकाम करुन प्राप्त झालेल्या मालमत्तेचे मुल्यनिर्धारण त्यांच्या संपादन किंमती नुसार किंवा बांधकाम किमतीनुसार केले आहे. बांधकाम काळामधील व्याज किंवा विभागून देण्याजोगा अप्रत्यक्ष खर्च यांचा समावेश भांडवली किंमती मध्ये धरलेला नाही.

२) स्थावर मालमत्ता जी ग्रामपंचायतींकडून ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली आहे, त्या बाबत कायदेशीर मालकी हक्काच्या पुराव्याचा आग्रह धरलेला नाही. कारण कायदेशीर मालकी हक्काच्या स्थानांतराची काही प्रकरणे प्रलंबित आहेत, व संबंधित अधिका-यांकडून त्याबाबत पाठपूरावा केला जात आहे. तथापी, सदरची मालमत्ता महानगरपालिकेच्या नियंत्रणात असल्यामुळे ती मालमत्ता ठाणे महानगरपालिकेच्या मालकीची धरण्यात आलेली आहे.

3) मालमत्तेच्या संपादनाची किंमत निश्चित करतांना आकस्मीक प्रत्यक्ष खर्च हा वर उल्लेख केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार धरण्यात आला आहे. तथापी, भाडयापोटी झालेला खर्च (Borrowing Cost), व खात्याअंतर्गत झालेल्या खर्चाचा संबंध मालमत्तेशी निश्चित होत नसल्यामुळे, तो मालमत्तेची किंमत ठरवितांना स्थावर मालमत्तेत अंतर्भूत केलेला नाही.

4) ठाणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांनी दिलेल्या माहितीनुसार दि. ०१/०४/२००४ रोजीच्या विवरणपत्रामध्ये दाखविलेली स्थावर मालमत्ता विचारात घेऊन निश्चित केली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचा वर्ग | वर्गामध्ये समाविष्ट केलेला मालमत्तेचा प्रकार | मालमत्तेच्या मुल्यनिर्धारणाची पध्दत | घसा-याचा दर |
|---|---|---|---|---|
| १ | जमीन आणि इमारत | जमीन | दर ठरविणारी पुस्तीका | ० |
| | | इमारत | प्रत्यक्ष खर्च | ३.३४ |
| २ | पायाभूत सुविधा संपदा | रस्ते व पूल | रस्त्याच्या प्रत्यक्ष खर्च व दर ठर विणा-या पुस्तीकेप्रमाणे पुलाचा खर्च | २% व २०% खालील टिप २ पहा |
| | | सांडपाणी आणि मलनिःसारण | इंडो- युसेडने केलेल्या मुल्य निर्धारणेनुसार | ३.३३% |
| | | जलवाहिन्या | इंडो- युसेडने केलेल्या मुल्य निर्धारणेनुसार | ३.३३% |
| | | सार्वजनिक दिवाबत्ती | प्रत्यक्ष खर्च | १५% |
| | | तलाव व बगीचे | प्रत्यक्ष खर्च | २०% |
| ३ | यंत्रसामुग्री | यंत्रसामुग्री | प्रत्यक्ष खर्च तसेच काही बाबींचा बदली करण्याचा खर्च | १०% |
| | | वाहने | प्रत्यक्ष खर्च | १५% |
| | | कार्यालयीन आणि इतर उपकरणे | प्रत्यक्ष खर्च तसेच काही बदली केलल्या वस्तूंचा खर्च | १५% |
| ४ | फर्निचर आणि फिक्चर्स | फर्निचर , फिक्चर्स, फिटींग्ज आणि विद्युत उपकरणे | प्रत्यक्ष खर्च तसेच काही बदली केलल्या वस्तूंचा खर्च | १५% |
| ५ | संगणक | संगणक | | २०% |
| | | संगणकीय सॉप्टवेअर्स | | २०% |

**टीपाः-**

१) महानगरपालिकेने सातत्याने लागू केलेल्या दराने स्थावर मालमत्तेवरील घसारा सरळ पध्दतीने आकारला जात आहे.

२) रस्त्यांच्या बाबतीत ४०% किंमतीवर, ५ वर्ष आयुर्मान गृहीत धरुन २०% दराने घसारा आकारला आहे, आणि उर्वरीत ६०% किंमतीवर ५० वर्ष आयुर्मान गृहीत धरुन २% दराने घसारा आकारला आहे.

३) सरळ पध्दतीने घसारा आकारण्याची तरतूद आहे. तसेच १ ऑक्टोबर रोजी किंवा तद्नंतर संपादित मालमत्तेवर निम्मा दराने घसारा आकारला आहे.

४) वर्षभरामध्ये जर प्रगती पथावरील कामांचे स्थावर मालमत्ते मध्ये रुपांतर केल्यास, सदरहू काम पुर्ण झाल्याची दिनांक निश्चित करता येत नसल्यामुळे पूर्ण वर्षाच्या दराने घसारा आकारला आहे.

विविध खात्यामधून मिळालेली सर्व माहिती वरील प्रमाणे समाविष्ट केली असली, तरीही सर्व मालमत्तेची भौतीक पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यास्तव मालमत्तेच्या भौतीक पडताळणी काळात कोणतीही विसंगती लक्षात आल्यास, वरील मालमत्तेमध्ये बदल करण्यांत येईल.

**ब) प्रगतीपथावरील भांडवली कामे- Capital Works in Progress.**

अपूर्ण असलेल्या किंवा उभारणी अपुर्ण असलेल्या ठराविक भांडवली कामासाठी केलेला खर्च त्या मालमत्तेच्या किंमतीमध्ये प्रगतिपथावरील कामे या सदराखाली अंतर्भूत केलेला आहे. बांधकाम किंवा प्रकल्प पूर्णत्वाकडे जात असतांना झालेला इतर खर्च जो ठराविक कामासाठी झाला आहे हे निश्चित करता येत नाही, तो "प्रगतीपथावरील कामांसाठीचा वाटता न येण्याजोगा खर्च" या सदराखाली ठेवून बांधकाम अथवा, प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर, पूरेसा शोध घेऊन त्या त्या बांधकामामध्ये किंवा प्रकल्पामध्ये वाटप केला आहे. चालू वर्षामध्ये पुर्ण झालेल्या कामांची माहिती व इतर सर्व माहिती संबंधित खात्यामधून मिळालेल्या पुष्टीच्या आधारावर आहे.

**क) प्रगतीपथावरील भांडवली कामांचे "भांडवली मालमत्ते " मध्ये रुपांतर :-**

अभियंत्यांनी सादर केलेल्या मोजमाप पुस्तका प्रमाणे पूर्ण झालेली आणि प्रत्यक्ष वापरण्यासाठी तयार असलेल्या वर्षभरातील कामांचे भांडवली मालमत्ते मध्ये रुपांतर केले आहे.

**२ ) गुंतवणूक:- Investment**

पूर्वीच्या ताळेबंदामध्ये दाखविलेल्या गुंतवणूकांच्या रकमेमध्ये रु. १,७०,९४,०००/- इतकी रक्कम मे. चेतना सहकारी बँक मर्यादीत यामध्ये ठेव म्हणून अंतर्भूत आहे. सदरची रक्कम न्यायालयीन अधिका-याच्या अधिपत्त्याखाली आहे. ठेव म्हणून असलेली ही रक्कम व त्यावरील उपार्जित व्याज वसूली विषयी न्यायालयीन प्रक्रीया सुरु केलेली आहे परंतू वसूली होण्याविषयी साशंकता आहे. सदरहू अपेक्षित नुकसानीसाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नाही, तसेच सदरहू ठेवीवरील मिळणारे व्याज सुध्दा अनिश्चित असल्यामुळे विचारात घेतले नाही.

**३ ) चालू संपदा - Current Assets :-**

**रोख रक्कम व बँकेतील शिल्लक:-**

ठाणे महानगरपालिकेने दि. १/०४/२००८ रोजी तयार केलेल्या सुरुवातीच्या विवरणपत्रानुसार दाखविलेल्या बँक खात्यातील सुरुवातीच्या शिल्लक रकमा आणि बँकेच्या नोंदी प्रमाणे असलेल्या सुरुवातीच्या शिल्लक रकमा जुळत नाहीत. काही बँक खात्यांचा ताळमेळ घालण्याचे काम बाकी असल्यामुळे महानगरपालिकेच्या पुस्तकात दाखविल्याप्रमाणे बँक खात्यातील सुरुवातीची शिल्लक रक्कम म्हणून धरली आहे. एकूण ९६ बँक खात्यांपैकी ताळमेळ न करण्यांत आलेल्या ३० खात्यांच्या बँक शिल्लक रक्कमेची ताळमेळाची प्रक्रिया बाकी आहे. आधीच्या वर्षांची काही बँक खाती कार्यरत नसून सदर ताळमेळापासून उद्भवणाऱ्या नोंदीचा भविष्यात त्या जेव्हा सापडतील तेव्हा परीणाम घेण्यांत येईल.

**४. येणे असलेल्या रकमा ( Receivables ) :-**

स्थावर मालमत्ता, लेखापरिक्षण, जन्म मृत्यु, आरोग्य आणि जकात मिलण्याजोगे येणी त्या त्या खात्यांनी माहिती पुरविल्याच्या आधारावर घेण्यांत आली आहे. वर्षनिहाय मिळण्याजोग्या येणे रकमांची विगतवारी जी पाणीखात्याच्या आणि मालमत्ता कर, पाणी कर बाबतीत आहे आणि त्याप्रमाणे एकंदर रक्कम जी खात्याने निश्चित केला ती सामील केलेली आहे.

**५. वापरता येणा-या वस्तू विषयी (Inventory ) :-**

वापरल्या जाणा-या वस्तू या वर्षभरातील खर्च समजून, संबंधित खात्याने कळविल्याप्रमाणे ३१ मार्च रोजी असलेला शिल्लक माल, खप झालेल्या मालाशी समायोजीत करुन साठा म्हणून दाखविण्यात आला आहे.

**६. आकस्मीक देणी (Contingent Liabilities ):-**

ताळेबंदच्या तारखेनंतर उद्‌भवणा-या आकस्मिकता आणि घटना AS४ नुसार आकस्मित देणी दाखविली आहेत.

**७. तरतूदी (Provisions) :-**

वर्षभरामध्ये उद्‌भवणा-या खर्च आणि देणी याच्यासाठी केलेली तरतूद ही संबंधित महसूली खर्चास आकारली आहे.

**८. पूर्वीच्या वर्षासाठीच्या साठलेल्या आगाऊ रकमा (Accumulated Advance Related to Earlier Years) :-**

विविध खात्यांना आणि विभागाकडील कार्यालयांना खर्च करण्यासाठी दिलेल्या रकमांचा समावेश "इतरांना दिलेल्या आगाऊ रकमा" या मध्ये आहे, रु. १७७२.२५ लक्ष इतकया रकमेचे समायोजन दिर्घ काळापासून अनिर्णीत आहे. वरील नमूद रक्कम आगाऊ रकमा याशिर्षाखाली असून त्या महसूली खर्च म्हणून दाखविण्यांत आलेल्या नाहीत. सदरहू रकमेची वर्षनिहाय व खातेनिहाय विगतवारी दप्तरी उपलब्ध असली तरी सुध्दा वेळखाऊ असणारे हे काम आणि यातून काय निष्पन्न होईल हा प्रश्न लक्षात घेऊन या रकमांची तपासणी आणि त्यांचे समायोजनेचे काम हाती घेतलेले नाही. तसेच या कामामध्ये काही प्रगती नसल्यामुळे आणि या रकमेतील काही भाग उलगडेल याची शक्यता कमी असल्यामुळे सदरहू रक्कम महानगरपालिका निधी / राखीव निधी यामधून कमी करुन दाखविण्यात आला आहे.

**९. गृहकर्जावरील व्याज :- Intrest on Housing Loan :-**

संबंधित पूरेशी नोंद उपलब्ध नसल्यामुळे कर्मचा-यांना दिलेल्या गृहकर्जावरील व्याज हे उपार्जित पध्दतीने विचांरात घेतले नाही.

**१०. महापालिका निधी खाते ( Municipal Fund Account ) :-**

या मध्ये महानगरपालिकेने दायित्वापेक्षा संपदेमध्ये जास्त असलेली वरकड (Surplus) दर्शविली आहे. आर्थिक वर्ष २००८ - ०९ सालासाठी महापालिका निधीमध्ये काही समायोजन केले आहे. ते खालील प्रमाणे आहे.

| तपशिल | रक्कम रुपये (लाखामध्ये ) | रक्कम रुपये (लाखामध्ये ) |
|---|---|---|
| आरंभीच्या विवरण पत्रानुसार दि. १/०४/२००८ रोजीची शिल्लक | | ७८,२९८.४२ |
| अधिक | | |
| घसारा निधी :-<br>विशेष निधाला / निक्षेप निधीला हस्तांतरण केली | ०.०३ | |
| रुग्णालय राखीव निधी:-<br>विशेष निधाला / निक्षेप निधीला हस्तांतरण केली | ०.०२ | |

| | | |
|---|---|---|
| कोकण वस्तु संग्रहालय राखीव निधी:-<br>विशेष निधीला / निक्षेप निधीला हस्तांतरण केली | ०.०४ | |
| रेल्वे पूल राखीव निधी:-<br>विशेष निधीला / निक्षेप निधीला हस्तांतरण केली | ०.०९ | |
| वेतन राखीव निधी:-<br>विशेष निधीला / निक्षेप निधीला हस्तांतरण केली | १.६६ | |
| क्रिडा प्रेक्षागृह राखीव निधी:-<br>विशेष निधीला / निक्षेप निधीला हस्तांतरण केली | ०.०१ | |
| जमिन - डी.आर.सी. रस्ते :-<br>आर्थिक वर्ष सन २००८-०९ मधील भु-संपादन | ४,५९०.४६ | |
| जमिन - डी.आर.सी :-<br>आर्थिक वर्ष सन २००८-०९ मधील भु-संपादन | १,७२०.६५ | |
| जमिन - सोयीसुविधा :-<br>आर्थिक वर्ष सन २००८-०९ मधील भु-संपादन | ९०६.०२ | |
| एकूण अधिक | | ७,२१९.०० |
| वजा | | |
| सन ०६-०७ साठीची करांची एकत्रित येणी :-<br>संबंधित खात्याने दिलेल्या माहितीनुसार येणे असलेल्या रकमेचे समायोजन केले | ० | |
| कर खात्याची दि. ३१/०३/२००५ पर्यंतची येणी :-<br>संबधित खात्याने दिलेल्या माहिती नुसार येणे असलेल्या रकमेचे समायोजन केले | ० | |
| बँक ऑफ मद्राराष्ट्र खाते क्र. १२५, उथळसर अदा न केलेली रक्कम:-<br>दि. ३०/०३/२००७ रोजी रु. ७५९७.२९ ची नोंद महापालिका निधीमध्ये घेतली परंतू बँकेच्या विवरणपत्रामध्ये नोंद पुढील महिन्यांत घेतल्यामुळे झालेल्या आरंभीच्या शिलकी मधील फरक | ० | |
| निविदा अनामत / सुरक्षा अनामत :-<br>मे. एस.एम.सी. इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची पावती क्र. २४४८ दि. १८/१०/०३ आणि पावती क्र. ३०४१ दि. २८/११/०३ बरोबर समायोजीत रक्कम, तसेच मे. स्टॅन्डर्ड कंन्स्ट्रक्शन यांची पावती क्र. ३६७० दि. २५/०३/०३ बरोबर समायोजीत केलेली रक्कम. | ० | |
| निविदा अनामत / सुरक्षा अनामत :-<br>ठाणे महानगरपालिका - जे.एन.एन.यु.आर.एम प्रकल्पासाठी जमीनीवरील मल निःसारण कामी ठाणे महानगरपालिकेचा प्रमाणशीर टक्केवारीने देय असलेल्या निधीची रक्कम | ० | |
| जलप्रदुषण कर :- | ० | |

| | | |
|---|---|---|
| सन १९८४ ते २००७ च्या कालावधीसाठी मा. जलप्रदुषण करासाठी अदा केलेली रक्कम | | |
| एकूण वजा रक्कम | | ० |
| महापालिका निधीशी समायोजीत निव्वळ रक्कम :-<br>१२२०८.५९ - ९४९.८६ | | ७,२१९.०० |
| समायोजन केल्यनंतर महापालिका निधी | | ८५,५१७.४२ |
| अधिक | | |
| विनियोगानंतर नफा तोटा दि. १/०४/२००८ रोजी | ५४,७३९.८७ | |
| सन २००८-०९ ची वरकड ( Surplus) | १९,१२४.६५ | |
| एकूण वरकड ( Surplus)दि. ३१/०३/२००९ रोजी | | ७३,८६४.५३ |
| **महानगरपालिका निधी दि. ३१/०३/२००९ रोजी.** | | **१,५९,३८१.९५** |